# संग्रहालय आणि पर्यटन

**मधुबाला वसंत मांजरे** संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. फोन नं. ८२०८९२४१२०
ई-मेल : kolimadhubala@gmail.com.

---

**प्रास्ताविक**

संग्रहालय म्हणजे इतिहास, संस्कृती, कला आणि विज्ञान याचा खजिना असणारे ठिकाण होय. जेथे प्राचीन वस्तू, शिल्प, चित्रे, नाणी, हस्तलिखिते आणि विविध ऐतिहासिक अवशेष जतन केले जातात. त्या निमित्ताने समाजाचा सांस्कृतिक वारसा व त्याचा बदलत गेलेला प्रगतीचा टप्पा आपणास संग्रहालयाच्या माध्यमातून समजतो. त्यातच मनुष्याला असणारी पर्यटनाची आवड त्याला या संग्रहालयाकडे खेचते. पर्यटन हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पर्यटनाच्या परंपरेतून वारसा मुशाफिरी जपताना आज विविध प्रकारे पर्यटन करतो. क्रिडा पर्यटन, आरोग्य पर्यटन, नैमित्तिक पर्यटन होय. पण आज वेगळ्या भुमिकेतून नवे विचार आज पर्यटनाला प्रेरक ठरत आहेत. जसे की विशिष्ट विषय विचारात घेऊन केले जाणारे पर्यटन ज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले गडकिल्ले, गांधी युगाचा इतिहास सांगणारे पर्यटन तसेच केवळ क्षेत्र अभ्यास करणारे संग्रहालयांचे पर्यटन होय. पर्यटनाच्या दृष्टीने संग्रहालयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देश, विदेशातील पर्यटक एखाद्या ठिकाणचा इतिहास आणि संस्कृतीची ओळख करून घेण्यासाठी संग्रहालयांना भेट देतात. संग्रहालयामध्ये असणारा ऐतिहासिक वारसा समजून घेतात. संग्रहालय आणि पर्यटन हे एकमेकांना पूरक घटक आहेत.

**संग्रहालयाची संकल्पना :**

संग्रहालयास इंग्रजीत ‘म्युझियम’ म्हणतात. हा शब्द लॅटिन "Museum" या शब्दापासून पासून आला आहे. तसेच हा ग्रीक भाषेतील meseion पासून आला आहे. ज्याचा अर्थ संगीत आणि कलेला प्रेरणा देणाऱ्या देवतांना समर्पित असलेले मंदिराचे ठिकाण असा होतो. त्यामुळे संग्रहालय म्हटले की ‘कला’ हा शब्द लगेच आठवतो. संग्रहालय ही समाजकल्याण आणि चौकस ज्ञानवृद्धिसाठी कार्यरत अशी स्थायी संस्था आहे. संग्रहालय म्हणजे इतिहास कला, विज्ञान आणि संस्कृतीशी संबंधित दुर्मिळ वस्तू, पुरावे व दस्ताऐवज यांचे शास्त्रोक्त जतन, संवर्धन आणि प्रदर्शन करणारे स्थान आहे जे सर्वांसाठी खुले आहे मानवी संस्कृतीच्या सुस्पष्ट आणि अस्पष्ट अशा ठेव्याचे संपादन, संशोधन, संदेशवहन, संवर्धन आणि सर्वसामान्यांना जागृत करणारी ‘‘ना लाभ, ना व्यावसायिक लोभ’’ अशी संस्था होय. संग्रहालयाचा इतिहास पाहता केवळ शैक्षणिक अध्ययनात्मक नसून पूर्वापार चालत आलेली संस्कृती नेमकी कशी होती, आपले वाड-वडील कसे रहात होते याचा परिचय आपणास संग्रहालय करून देतात. आज इंटरनेट, गुगलसारख्या सर्च इंजिनमधून सांस्कृतिक ठेव्याची माहिती मिळते. त्या साऱ्या वस्तू ती संस्कृती संग्रहालयाच्या पर्यटनातून प्रत्यक्ष अनुभवता येते. आपल्या संस्कृतीविषयी विस्तृत जाणून घेता येते ते संग्रहालयामुळे. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात संग्रहालयांचे अनन्य साधारण महत्त्व आहे.[१]

संग्रहालय ही कायमस्वरूपी सार्वजनिक किंवा खाजगी संस्था आहे. जी नफा कमवणारी किंवा न कमवणारी असू शकते. पण देशाचा सांस्कृतिक वारसा जपताना त्यांचे ऐतिहासिक मुल्य अनन्यसाधारण आहे.[२] अशा संग्रहालय पर्यटनातून मानवाच्या उत्क्रांती पासून ते विज्ञान, अवकाश ज्ञानापर्यंत ज्ञान भांडार लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न संग्रहालये करतात. मानवी जीवनाचा सखोल इतिहास व प्रगती आपणास संग्रहालयातून अभ्यासता येतो.

**पर्यटनाची संकल्पना**

पर्यटन म्हणजे प्रवास, इंग्रजी भाषेतील ‘‘टुरिझम’’ या संज्ञेचा हा पर्याय आहे. इंग्रजी भाषेत ‘‘टुरिस्ट’’ म्हणजे ‘‘पर्यटक’’ ही संज्ञा ‘‘ट्रॅव्हलर’’ (प्रवासी) या शब्दाऐवजी एकोणिसाव्या शतकारंभी वापरण्यात येऊ लागली.[३] इंग्रजीमध्ये Tourism चा Tour या लॅटिन भाषेपासून निर्मिती झाली. Tournos चा अर्थ औजार म्हणजे चाक किंवा गती, यात्रा-चक्र असाही आहे. Tour एक हिब्रू (Hebrew) शब्द आहे, जो Torah या शब्दापासून निर्माण झाला आहे. ज्याचा अर्थ ज्ञान संपादन अथवा शोध घेणे असा आहे. तर फ्रान्स च्या साहित्यामध्ये 'grand tour' चा अर्थ 'great tour' जो Tour पासून निर्माण झाला ज्याचा अर्थ फ्रान्स, जर्मनी, स्विझरलॅण्ड, इटली या अनेक देशाची सहल होय. असे विशेषत्वाने व्यापारी देवाण-घेवाणीच्या माध्यमातून हा शब्द निर्माण झाला आहे.[४]

दूरवरच्या स्थळांना विशिष्ट हेतूने भेट देण्यासाठी प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात थॉमस् कुकने सहाशे लोकांची लीसेस्टर ते लाफबरो अशी रेल्वे सहल आयोजित केली. १८८५ च्या पॅसिस प्रदर्शन काळात, कुकने लीसेस्टर - कॅले अशा सहली काढल्या व पुढच्या वर्षी संबंध युरोपची भव्य अशी पहिली वर्तुळाकार सहल यशस्वीपणे घडवून आणली. काही वर्षांनी पर्यटन तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला व आधुनिक पर्यटनाची सुरूवात झाली.[५]

पर्यटनाचा इतिहास समजून घेताना विष्णूभट गोडसे यांच्या ''माझा प्रवास'' याचा उल्लेख विशेषत्वाने करता येईल. १८५७ च्या उठावाच्या काळात स्वातंत्र्यासंबंधीच्या अनेक गोष्टींचे ते प्रत्यक्ष साक्षीदार होत. राणी लक्ष्मीबाई याच्या जीवनाविषयीचे तपशील या प्रवासवर्णनातून समजतात. एवढेच नव्हेतर अठराव्या शतकातील मराठी भाषेचे स्वरूप ही त्यांच्या पर्यटनातून या पुस्तकात नमूद केले आहे.[६] ज्यातून पर्यटनाचे महत्त्व आपणास समजून येते. आधुनिक पर्यटन हा एक स्वतंत्र असा स्थानिक, आंतरराज्यीय, आंतरराष्ट्रीय व्यवसाय झालेला आहे. मानवनिर्मिती अशा पर्यटनात संग्रहालये आपली खुणगाठ बांधत आहेत.

**संग्रहालयाचे प्रकार**

वस्तुसंग्रहालयाचे विविध प्रकार पडतात. काही विशिष्ट विषयापुरते मर्यादित असतात. तर काही अधिक विषयांना एकत्रितपणे बांधण्याचे काम करतात. प्रत्येक संग्रहालयाला पुरातन पार्श्वभूमी आहे. त्यामुळे वस्तुसंग्रहालय ही समाजशिक्षणाचा एक भाग म्हणता येईल. भारतीय कलेमध्ये मुर्तीकला, कास्यमूर्ती, कापडावरील नक्षीकाम (कलमकरी), लाकडावरील नक्षीकाम, लघुचित्रे, आधुनिक चित्रे, हस्तीदंत कला, जाड कारवीन, टेक्साईल, मेटल चीनी मातीच्या वस्तू, हस्तलिखित, शस्त्रे, चिलखत यांचा समावेश होतो. जी संग्रहालयामध्ये प्राण आणण्याचा प्रयत्न करतात.[७] काही अशा ऐतिहासिक वस्तूनी शोभीत असतात. तर काही संग्रहालये व्यक्तीचे प्रतिनिधित्त्व करतात. उदा. आगाखान पॅलेस पुणे, मणिभवन मुंबई, चंद्रकांत मांडरे कलादालन कोल्हापूर, केसरीवाडा पुणे.[८]

**१) ऐतिहासिक संग्रहालय :**

जगातील सर्वात प्राचीन समजले जाणारे (इ.स.पु. ६ वे शतक) संग्रहालय मेसोपोटोमियातील 'उर' या शहरात उत्खनन करताना सापडले. हे संग्रहालय एनिगॉली नावाच्या मेसोपोटेमियाच्या राजकन्येने बांधले होते. ती स्वत: त्या संग्रहालयाची संग्रहपाल म्हणून काम पहात होती. या संग्रहालयात सापडलेल्या वस्तूचे सविस्तर वर्णन करणाऱ्या मातीच्या वरिका (Claytablets) होत्या. यानंतर मध्ययुगातील राजघराण्यातील व्यक्ती आणि श्रीमंत लोक यांनी कलावास्तूंना स्वरूप देण्याच्या हेतूने पॅरीस शहरात लुव्र संग्रहालय उभे केले जे 'मोनालिस' या बहुचर्चित चित्राची साक्ष देत आहे. जवळ-जवळ ३ लाख ८0 हजार हुन अधिक ऐतिहासिक वस्तू या संग्रहालयात आहेत. ब्रिटीश संग्रहालय इंग्लंड, नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी, युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका अशी काही उदाहरणे आहेत.[९]

**कला संग्रहालय**

संग्रहालयाच्या पर्यटनात कलाप्रेमी संग्रहालयांना भेट देतात. ज्यामध्ये चित्र, शिल्प याचा विशेषकरून समावेश होत असतो. अशा कला प्रेमीचा ओढा मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय भाऊदाजी लाड संग्रहालय, जहॉगीर आर्ट गॅलरी, जे. जे. आर्ट स्कूल, राष्ट्रीय संग्रहालय यांना भेटी देतात. नव्या पिढीस भारतीय कलेचा वारसा येथून संक्रमित होत आहे. या संग्रहालतयानू आधुनिक कलेचे वास्तववादी चित्रण होत आहे. कला संग्रहालयाचा उल्लेख करता पुण्यातील राजा केळकर संग्रहालय, पेशवे संग्रहालय येथील जयंत खरे यांनी रेखाटलेली पेशव्यांचा इतिहास वर्णन करणारी चित्रे अप्रतिम आहेत तर केळकर म्युझियम मस्तानी महल, कलात्मक अडकित्ते, दिवे, लाकडी कमानी यांचे अनोखे दर्शन घडवितात. झपुर्झा कला व संस्कृती संग्रहालयात, काडेपेटीच्या बॉक्सपासून ते सिनेसृष्टीचा ऐतिहासिक वारसा जपलेला आहे. तर अशा संग्रहालयांना भेट देऊन पर्यटक आज कलेची आवड उपभोगत आहेत.[१०]

**विज्ञान संग्रहालय**

विशिष्ट वैशिष्ट्यांनी संपन्न असणाऱ्या विज्ञान संग्रहालयामध्ये प्राचीन उत्खननात सापडलेल्या वस्तूपासून आज आधुनिक वस्तूचाही समावेश होत आहे. जसे की पुण्यातील डेक्कन कॉलेज म्युझियम येथे आपणास विविध प्राचीन भाषा, आदिवासी वस्तू, विज्ञानातील वस्तूचे मॉडेल जे आपणास होऊन गेलेल्या घटनांची साक्ष देतात. तसेच महात्मा फुले संग्रहालय हा तर विज्ञानातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीची साक्ष देत आहे. त्याचप्रमाणे मुंबईतील नेहरू प्लॅनेटरीयम, सायन्स सेंटर, रेल्वे संग्रहालय, सायकल संग्रहालय, पुणे ही अशी काही संग्रहालय यामध्ये समाविष्ठ आहेत. जे भूगर्भातील वास्तवापासून ते अवकाश, तंत्रज्ञान यातील बदल आपणास समजून देत आहेत.[११]

**भारतातील प्रसिद्ध विशेष संग्रहालय**

कोलकत्ता येथील भारतीय संग्रहालय हे भारतातील पहिले एशियाटिक सोसायटी ऑफ कलकत्ता येथे उभे करण्यात आले. या संग्रहालयाचा मुंबई व मद्रास या ठिकाणी शाखा स्थापन केल्या. ज्याचा मूळ उद्देश भारतीय संस्कृतीच्या अभ्यासासाठी झाला. १८ व्या शतकात चतुर्थकात भारतीय संस्कृती आणि प्राचीन स्मारके यांची जिज्ञासा इंग्रज राज्यकर्त्याच्या मनात रूजली व सर विल्यम जोन्स, वॉरन हेस्टिंग्ज यांनी १५ जानेवारी १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. इसवी सन १८१४ मध्ये सुप्रसिद्ध भारतीय संग्रहालयात मांडले गेले. ज्यामध्ये सापडलेल्या शिल्पे व अवशेषांचा समावेश आहे.[१२] चेन्नई येथील

इसवी सन १८५१ मध्ये गव्हरमेंट म्युझियम हे भारतातील दुसरे संग्रहालय तर इसवी सन १८४९ मध्ये दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयाची स्थापना झाली. संग्रहालयांचे आजमितीला विविध राज्यांमध्ये अनेक संग्रहालये आहेत.[१३]

**पर्यटन विकासात संग्रहालयाचे योगदान**

आज संग्रहालये देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करत आहेत. पण त्याचबरोबर वस्तुसंग्रहालये सामान्य जनतेसाठी कार्य करणारी एक शैक्षणिक संस्थाही आहे. यंत्रे, चित्र, तक्ते, चित्रफिती, प्रतिकृती, प्रदर्शनीय वस्तूद्वारा विज्ञानाच्या विविध शाखांचे उगमस्थान व त्यांची प्रगती, तिचे आजच्या व्यवहारातील स्थान व त्या विज्ञान शाखांचा उपयोग शेती आणि वाणिज्य या क्षेत्रामध्ये कसा केला जातो व आर्थिक विकास कसा होतो याचे दर्शन घडवण्यात संग्रहालयाचे खुप मोठे योगदान आहे.[१४] त्यामुळे संग्रहालय पर्यटनाच्या माध्यमातून मानवी संस्कृतीचा वारसा जतन करून ठेवण्याचे फार मोलाचे कार्य संग्रहालय करतात. आज संग्रहालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम साजरे केले जातात. शैक्षणिक संशोधन, व्याख्याने, विविध चर्चा सत्रे, कार्यशाळाच्या माध्यमातून विविध उपक्रम संग्रहालये घेत आहेत. उदाहरणार्थ, प्राचीन भाषा अध्यापन वर्ग, मोडी, ब्राह्मी या भाषांचे वर्ग घेतले जातात. या उपक्रमांच्या निमित्ताने लोक पर्यटन करतात व जुन्या इतिहासाला उजाळा देतात व नव्या पिढ्यांना ते सोपवतात.[१५]

आर्थिक हा दृष्टीकोनातून पर्यटन उद्योग खुप महत्त्वाचा आहे. अशा निमित्तांनी पर्यटक जेव्हा भेटीस येतात तेव्हा तेथील सेवा उद्योगांना महत्त्व होत. वस्तूचे उत्पादन, वितरण सेवा हे दिर्घकाळ आर्थिक विश्लेषण करतात. संग्रहालयांचे मॉडेल, संदर्भ अंक, पुस्तके यांचे वितरण, हॉटेल, वस्तुभांडार, कलात्मक वैशिष्ट्यपूर्ण वस्तूची विक्री यातून ही अर्थाजनास मदत होत रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.[१६]

**आधुनिक तंत्रज्ञान व संग्रहालये**

आज संग्रहालय नव्या पद्धतीने लोकांना आकर्षित करत आहेत. नव्या तंत्रज्ञानाच्या वापरातून संग्रहालय सादरीकरणात नाविण्य आले आहे. व्हर्च्युअल टूर, ऑडिओ गाईड, डिजिटल डिल्पे, ३D मॉडेल, प्रकाशयोजना नाविन्यपूर्ण साहत्याची मांडणी यांचा तांत्रिक पद्धतीने वापर केला जातो आहे. संग्रहालयातील वस्तूंची काळजी घेताना आधुनिक तंत्रज्ञान व साहित्य याचा वापर केला जात आहे, आज एक नविन विचार बहुतांशी संग्रहालयात पहावयास मिळत आहे तो म्हणजे वस्तूची फेरबदली करणे, नाविण्यपूर्ण वस्तू एका संग्रहालयातून दुसऱ्या संग्रहालयात काही दिवसासाठी प्रदर्शित करणे व त्याची जाहिरात करून लोकांना आकर्षित करणे. नव्या प्रशिक्षित वर्गाची नेमणूक करून योग्य पद्धतीने सुनियोजित व्यवस्थापन केले जात आहे. यामुळे संग्रहालय पाहण्याकडे लोकांचा ओढा वाढत आहे.[१७]

**संग्रहालयासमोरील आव्हाने**

नवीन तंत्रज्ञानामुळे एक सांस्कृतिक क्रांती घडत आहे, जी संग्रहालयाबद्दलच्या दृष्टिकोनावरही परिणाम करत आहे. ऑनलाईन माध्यमाद्वारे जगभरातील लोकांना घरबसल्या संग्रहालयाचा अनुभव घेता येत आहे. त्यामुळे संग्रहालयांकडे येणारा ओढा कमी होत आहे. नव्या पिढीला काय हवं त्या दृष्टीने व्यवस्थापन करताना संग्रहालय शास्त्रज्ञ लोकांना संग्रहालयात पूर्णपणे सामील करून घेणारे अनुभव देण्यासाठी व माहिती अधिक सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी व्हर्च्युअल रिॲलिटीचा वापर करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्यामुळे नव्या नाविन्यात जुनेपण हरवत चालले आहे.[१८] तसेच संग्रहालयासाठी लागणारे स्थापत्यविशारद, अभियंते, इतिहासकार, पुरातत्वज्ञ, संग्रहापाल, समाजशास्त्रज्ञ, अभिलेखागार, कायदेतज्ज्ञ, छायाचित्रण तज्ज्ञ अस मोठा समूह संग्रहालयाची देखभाल घेण्यासाठी आवश्यक असतो. पण त्यांना देण्यासाठी लागणारे मानधन पुरविणे संग्रहालयांना अवघड होत आहे.[१९] संग्रहालयाची योग्य देखभाल घेणे, निधी गोळा करणे, जनतेचा प्रतिसाद वाढवणे, संग्रहालयाविषयी जनजागृती करणे, पर्यटकांना आकर्षित करणे अशी अनेक आव्हाने संग्रहालयासमोर आहेत. यासाठी जनतेचा प्रतिसाद व समाजातून वरिष्ठ मंडळींचा मदतीचा हात जर संग्रहालयांना मिळाला तर संग्रहालय पर्यटनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे केंद्र बनत जाईल.

संग्रहालयाची योग्य देखभाल घेणे, आर्थिकदृष्ट्या संग्रहालयांना जमेलच असे होत नाही. संग्रहालय पहायला येण्यात लोकांची उदासिनता, वस्तुची देखभाल न घेणे, लोकाच्यामध्ये संग्रहालय विषयी जनजागृती कमी असणे याही गोष्टी आज संग्रहालय समोरील आव्हाने आहे.[२०]

**निष्कर्ष :**

संग्रहालय ही देशाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन करणारी महत्त्वाची केंद्रे आहेत. ती केवळ प्राचीन वस्तूंचे प्रदर्शन करणारी ठिकाणे नसून ती शिक्षण, संशोधन आणि सांस्कृतिक जतनाची केंद्रे आहेत. त्याचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने विचार करता संग्रहालयाच्या पर्यटनातून आकर्षित होणाऱ्या पर्यटकांना न्याय मिळायला हवा. बहुविविध नाविन्य व वस्तूच्या जतनाची व त्याकडे आकर्षित करण्याची तांत्रिकता संग्रहालयामध्ये अस्तित्त्वात आली पाहिजे. काही संग्रहालये तसे प्रयत्न करून आज नावारूपाला येत आहेत. पण काही निधी, उत्पन्न व वस्तूच्या ऐतिहासिक मुल्यांचे व्हीज्युलायजेशन न झाल्याने ती नावारूपाला आलेली नाहीत. काही खाजगी संग्रहित वस्तूंना पर्यटनाचे स्वरूप देण्यात कमी पडत आहेत. संग्रहालय पर्यटन करण्याचा संबंध केवळ आर्थिक दृष्टीकोनातून जोडला जात नाही. तर तो शैक्षणिक, सांस्कृतिक हेतू ही साध्य करत आहेत. लोकांमध्ये परस्पर आदर, सहिष्णूता, इतिहासाविषयीचा आदरभाव, जुन्या पिढीच्या योगदानाची आधुनिक पिढीला असणारी उदासिनता व नव्या वैज्ञानिक दृष्टिकोन सांगण्यात जूना वारसा मोडून काढणारी नवी पिढी यामुळेही संग्रहालयांचे पर्यटन कमी होत आहे. ही एक बाजू असली तरी सांस्कृतिक वारसा पिढीजातपणे टिकवणारी पिढी आजही संग्रहालयाकडे आकर्षित होत आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने पाहिले असता पर्यटकांचा संग्रहालय हा पसंती क्रम असतोच. एखाद्या देशाचा किंवा प्रदेशाचा इतिहास आणि संस्कृती ओळख जाणून घेण्यासाठी पर्यटक इच्छूक आहे. ज्या संग्रहालयांना पर्यटक भेटी देतात त्या संग्रहालय पर्यटनाच्या माध्यमातून उद्योगांना चालना मिळत आहे. अर्थव्यवस्थेस बळ मिळत आहे. रोजगार उपलब्ध होत आहेत. पण अजूनही पर्यटनात संग्रहालयाचा प्रभाव वाढवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून आकर्षित करणे, संग्रहालयाचा प्रचार वाढवणे लोकांमध्ये जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे व त्याचबरोबर संस्था, संघटना, संशोधक, इतिहासकार याच्या पुढाकाराने संग्रहालयाचा वारसा व पर्यटन वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अखेर असे म्हणता येईल की संग्रहालय आणि पर्यटन हे दोघेही एकमेकात पुरक आणि आवश्यक घटक आहेत. संग्रहालय पर्यटनाला समृद्ध करतात तर पर्यटन संग्रहालयांना आर्थिक आणि सामाजिक बळ देतात. या दोहोच्या समन्वयातून देशाचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकास होण्यास मदत होत आहे. संग्रहालयाचे संवर्धन करणे म्हणजे एक प्रकारे देशाची सांस्कृतीकता व परंपरा यांचे रक्षण करणे आहे. त्यामुळे संग्रहालयाच्या इतिहासाचा समृद्ध वारसा विचारात घेऊन हा मोलाचा वारसा संवर्धीत केला पाहिजे, ज्यामुळे पर्यटनास मोठी चालना मिळेल, संग्रहालय व संग्रहालयातून होणारे पर्यटन ज्यामुळे एकमेकास पुरक ठरतील.

**संदर्भ**

१. 'अ' अनाम प्रेम (प्रेम शिंपीत जा) जागतिक संग्रहालय दिन अंक शनिवार १८ मे २०२४ पृष्ठ क्रमांक १
२. https://mr wikipedia.org
३. तर्कतीर्थ श्र. लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड ९, प्रकाशक : सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मंत्रालय, मुंबई; १९८०, पृ. क्र. २७५.
४. डॉ. कि. के. दीक्षित, डॉ. जे. पी. गुप्ता, पर्यटन के विविध आयाम, तक्षशिला प्रकाशन, टी. एस. विष्ट. संस्करण २००९, पृष्ठ क्र. २१
५. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी मराठी विश्वकोश खंड ९ उपरोक्त पृष्ठ क्र. २७६.
६. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे इयत्ता १० वी इतिहास प्रकाशक - श्री. विवेक उत्तम गोसावी पृष्ठ क्र. ५३.
७. Dr. A.K.V.S. REDDY (Director) Salar Jung Museum Guide Book, NAWAB MIR YOU SUF ALI KHAN SALAR JUNG III, Published by - Salar jung museum Hyderabad.
८. प्रत्यक्ष भेट दिनांक १० जानेवारी २०२६.
९. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. इयत्ता १० वी (इतिहास) उपरोक्त पृष्ठ क्र. ६०, ६२.
१०. प्रत्यक्ष भेट - म्युझीयम - १३ जानेवारी २०२६
११. प्रत्यक्ष भेट - म्युझीयम - १३ जानेवारी २०२६
१२ तर्कथीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड १२, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ १९८५, पृष्ठ क्र. ३९६.
१३. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, उपरोक्त पृष्ठ क्र. ६१.

१४. महात्मा फुले वस्तुसंग्रहालय पुणे पुरवणी.
१५. जागतिक संग्रहालय दिन, टाऊन हॉल म्युझियम भेट मुलाखत-श्री. अमृत पाटील सर (क्युरेटर)
१६. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी मराठी विश्वकोश खंड ९ उपरोक्त पृष्ठ क्र. २७६
१७. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, इयत्ता १0 वी इतिहास उपरोक्त पृष्ठ क्र. ५९
१८. मुलाखत - छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई सौ. पाठक दिनांक - १३ जानेवारी २०२६.
१९. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे इयत्ता १0 इतिहास उपरोक्त पृष्ठ क्र. २0.
२0. मुलाखत - आदिती रानडे, राजा दिनकर केळकर संग्रहालय (क्युरेटर) १0 जानेवारी २०२६